ePaper
वर्ष - 9 । अंक -64 UDYAM-MH-26-0158827

## ‘वस्त्रहरण’कार गंगाराम गवाणकर यांचं निधन



महाईन्यूज ™

### आतील पानांत

- सूर्यकुमारच्या कामगिरीबाबत निश्चिंत!
- बद्रुमाचे कसोटी मालिकेसाठी पुनरागमन
- व्यापार तत्त्वांची निवडक अंमलबजावणी
- आयोगाची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात

www.mahaenews.com । मंगळवार, दि. 28 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आदित्य ठाकरेंचा निवडणूक आयोगावर बॉम्ब


### मतदारयाद्यांतील घोळांमुळेच विधानसभा पराभव

# जमीनदोस्त दुकानात 48 मतदार, सगळेच घसीटाराम!

### लोकसभा निवडणुकीनंतर वरळीत १६,०४३ नवीन मतदार वाढले

। मुंबई ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**“घसीटाराम हलवाई या दुकानाच्या पत्त्यावर ४८ मतदार नोंदले गेले आहेत, आणि धक्कादायक बाब म्हणजे ते दुकान गेल्या दहा वर्षांपासून अस्तित्वातच नाही!” — शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी हे वक्तव्य करताच मुंबईतील “निर्धार मेळाव्यात” उपस्थित शिवसैनिक थक्क झाले. वरळी मतदारसंघातील मतदार याद्यांतील प्रचंड विसंगतींचा पर्दाफाश करत आदित्य ठाकरेंनी निवडणूक आयोगावरच तीव्र हल्ला चढवला.**




त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, “लोकसभा निवडणुकीत उत्तम कामगिरी करूनही महाविकास आघाडीचा विधानसभा निवडणुकीतील पराभव हा या मतदार याद्यांतील घोळांचा परिणाम आहे. आयोग निष्पक्ष नसून भाजपचं काम करत आहे.”

**१९ हजारांहून अधिक मतदारांबाबत गडबड**

आदित्य ठाकरेंनी वरळी मतदारसंघातील तपशील समोर ठेवत सांगितले की, १९ हजार ३३३ मतदारांच्या माहितीमध्ये विसंगती आढळली आहे. त्यांनी या सर्व चुका, विसंगती, मृत व्यक्तींच्या नावांवरील नोंदी, चुकीचे लिंग व पत्ते — हे सर्व पुरावे मोठ्या स्क्रिनवर दाखवत मतदार याद्यांची “चिरफाड” केली. “मतदाराचं नाव आणि वडिलांचं नाव एकच, महिलांच्या पुढे ‘पुरुष’ अशी नोंद, मराठी आडनावाच्या वडिलांचं नाव गुजराती — हे सगळं विनोदी पण धोकादायक आहे,” असा घणाघात आदित्य यांनी केला.

**“शतायुषी व्हायचं असेल तर वरळीत या!”**

ठाकरेंनी हलक्याफुलक्या पण टोचदार भाषेतही या गोंधळावर टिप्पणी केली. “वरळीत तब्बल ११३ मतदार शंभरी ओलांडलेले आहेत! मला तर विकासकांना सांगावसं वाटतं — शतायुषी व्हायचं असेल तर वरळीत घर घ्या!” असं म्हणत त्यांनी उपस्थितांमध्ये हास्यकल्लोळ पसरवला. “शालिनी पार्टे यांचं निधन २००० साली झालं, दिंदेशी तिवारी २००७ ला आणि कृष्ण अडवाणी १९९५ मध्ये मरण पावले. पण त्यांच्याही नावानं आज मतदान होतं! हे लोक मरणोत्तर मतदान कसं करतायत?” असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला.

**१० बाय १० घरात ३८ मतदार, आणि... ‘घसीटाराम हलवाई’चे ४८ मतदार!**

आदित्य ठाकरेंनी यावेळी एका लहानशा १०x१० घराचा व्हिडीओ दाखवला. या घरात २-४ माणसं कसंबसं राहू शकतील, पण त्याच पत्त्यावर तब्बल ३८ मतदार नोंदवले गेले आहेत, आणि ते सर्व तिथे राहतच नाहीत, असा खुलासा त्यांनी केला

**धक्कादायक माहिती उघड**

“घसीटाराम हलवाई या दुकानाच्या पत्त्यावर ४८ मतदारांची नोंद आहे. मात्र हे दुकान दहा वर्षांपूर्वीच पाडण्यात आलं आहे. आणखी गंमत म्हणजे सर्वांच्या नावावर ‘घसीटाराम हलवाई’ असंच लिहिलं आहे!” या उघडकीनंतर प्रेक्षकांकडून हशा आणि संताप दोन्ही प्रतिक्रिया उमटल्या.

**पत्तेच गोंधळलेले, काहींमध्ये प्रश्नचिन्ह आणि उद्गारवाचक चिन्ह!**

वरळीतील ४,१७७ मतदारांचा पत्ताच सापडलेला नाही, असं ठाकरेंनी सांगितलं. “काही मतदार ओळखपत्रांवरील घरांच्या पत्त्यात ‘?’ आणि ‘!’ अशी चिन्हं आहेत. अशी घरं शोधायची कशी? आणि जर एखाद्या घरात ११ पेक्षा अधिक लोक राहत असतील, तर ERO अधिकाऱ्यांनी पाहणी करायला हवी होती — ती झाली का?” असा प्रश्न त्यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून विचारला.

**‘पुनर्जन्म घेतलेले’ मतदार!**

ठाकरेंनी एका विचित्र प्रकरणाचा उल्लेख करत सांगितले की, नरहरी भीमराव कुलकर्णी नावाचे मतदार लोकसभेला यादीतून डिलीट झाले, पण विधानसभा निवडणुकीआधी “पुनर्जन्म” घेऊन दुसऱ्या क्रमांकाच्या यादीत दिसले आणि निवडणुकीनंतर पुन्हा गायब झाले!

### ५०२ मतदारांचे नाव-वडिलांचे नाव एकच!

वरळीत ५०२ मतदार असे आहेत, ज्यांचं नाव आणि वडिलांचं नाव एकच आहे. उदाहरण देत त्यांनी सांगितले. “विठ्ठल रामचंद्र झाड यांच्या वडिलांचं नावही विठ्ठल रामचंद्र झाडच आहे! कृष्णा कृष्णमुर्ती, राजी कुप्पूरस्वामी, सुलेमान मोहम्मद रझाक — हे सगळे उदाहरणं आहेत,” असं त्यांनी नमूद केलं.याशिवाय, काही ठिकाणी तर वडील मराठी तर बाप गुजराती — अशा गोंधळांचा भडिमार त्यांनी दाखवला. “१५० क्रमांकाच्या यादीत गिरीश गजानन म्हात्रे नावाचा मतदार आहे, पण त्याच्या वडिलांचं नाव भानजी पटेल आहे! २७ क्रमांकाच्या यादीत दुय्योडाप रामनंदन यादव नावाच्या मतदाराचे वडील सहदेव वाघमारे आहेत,” असं त्यांनी सांगत आकडेवारी सादर केली. वरळीत आडनाव विसंगती असलेले ७२० मतदार असल्याचाही दावा त्यांनी केला.

पुण्याची जनता सुज्ञ आहे योग्य निर्णय घेऊ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# विनाकारण मोहोळांचं नाव घेतलं जातंय!

## जैन बोर्डिंग जमीन प्रकरणात फडणवीसांचं मोठं भाष्य

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तीपुण्यातील चर्चेतील जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार प्रकरणावरून माजी आमदार रवींद्र धंगेकर आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात सुरू असलेल्या आरोप-प्रत्यारोपांच्या वादावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठं भाष्य केलं आहे.**



### राजकीय वर्तुळात चर्चा

देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यानंतर पुण्यातील राजकीय वर्तुळात नवी चर्चा रंगली आहे. रवींद्र धंगेकर आणि मुरलीधर मोहोळ यांच्या वादात आता राज्य नेतृत्व उतरल्याने या प्रकरणाला आणखी वेग येईल, अशी चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे, जैन समाजातील मंडळी सरकारच्या भूमिकेवर बारकाईने नजर ठेवून आहेत. या प्रकरणात सरकारने कोणता निर्णय घेतला, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होईल. परंतु फडणवीसांनी केलेल्या या विधानानं धंगेकर-मोहोळ वादात निश्चितच नवा ट्विस्ट आला आहे.

"या प्रकरणात काही जण विनाकारण मोहोळांचं नाव घेत आहेत. पुण्याची जनता सुज्ञ आहे, सर्वकाही पाहत आणि समजत आहे," असं वक्तव्य फडणवीसांनी केलं. त्यांनी स्पष्ट केलं की, "हा मुद्दा बिल्डर्स आणि जैन समाजातील आहे. सरकार या प्रकरणात जैन समाजाच्या भावना समजून घेऊन त्यांच्या मनाप्रमाणे योग्य निर्णय घेईल."

**जैन बोर्डिंग जमीन; पेटलं पुणे**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील जैन बोर्डिंग हाऊस जमीन व्यवहार हा विषय राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. या प्रकरणात रवींद्र धंगेकर यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोपांची मालिका केली आहे. प्रत्येक दिवशी नवीन आरोप, नवीन कागदपत्रं आणि पत्रकार परिषदांच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपांचा सूर वाढत चालला आहे. धंगेकर यांच्या आरोपांमुळे मोहोळ समर्थक आक्रमक झाले आहेत, तर दुसरीकडे विरोधकांनी या विषयावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यामुळे पुण्यातील राजकीय वातावरण तापलं असून या वादावर सर्वांचे लक्ष केंद्रीत आहे.

**फडणवीस: "विनाकारण मोहोळांचं नाव घेतलं जातंय"**

या प्रकरणावर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "या विषयावर काही भूमिका घेण्याचं कारण नाही. अनेक वेळा निवडणुका जवळ आल्या की काही लोक प्रसिद्धी मिळवण्यासाठी मुद्दे निर्माण करतात. हा विषय एका बिल्डर आणि आपल्या जैन बांधवांमधला आहे. त्यात सरकारची जी भूमिका आहे, ती आम्ही घेतलेली आहे."

फडणवीस पुढे म्हणाले, "आम्ही जैन समाजाच्या भावना समजून घेत आहोत. या प्रकरणात जैन समाजाच्या मनाप्रमाणेच योग्य निर्णय होईल. मात्र, काही लोक विनाकारण मंत्री मुरलीधर मोहोळ यांचं नाव यात ओढण्याचा प्रयत्न करत आहेत. पण पुण्याची जनता सर्व पाहत आहे, तिला सगळं कळतं."

**धंगेकरांचा आरोप आणि मोहोळांची प्रतिक्रिया**

रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या आरोपांनुसार, जैन बोर्डिंग हाऊसच्या जमिनीच्या व्यवहारात अनियमितता झाली असून त्यामागे काही राजकीय प्रभाव आहे, असा त्यांचा दावा आहे. त्यांनी या प्रकरणात मुरलीधर मोहोळ यांचं नाव घेत ठोस पुरावे असल्याचं सांगितलं. तर मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सर्व आरोप फेटाळत म्हटलं की,

"मी या व्यवहाराशी कोणत्याही प्रकारे संबंधित नाही. माझं नाव घेतलं जातंय, ते राजकीय हेतूनं. हा मुद्दा केवळ जैन समाज आणि विकासक यांच्यातील आहे." त्याचप्रमाणे त्यांनी धंगेकरांवर "राजकीय प्रसिद्धी मिळवण्यासाठी निराधार आरोप केल्याचा" आरोप केला आहे.

**"जैन समाजाच्या भावना महत्त्वाच्या" — फडणवीस**

या सर्व गदारोळात फडणवीसांनी सरकारच्या भूमिकेचं स्पष्टीकरण दिलं. "राज्य सरकारने सुरुवातीपासूनच जैन समाजाच्या भावना लक्षात घेऊन या प्रकरणात समेटाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला आहे. शासन जैन समाजाच्या हिताच्या बाजूनेच निर्णय घेईल," असं त्यांनी सांगितलं. त्यांनी पुढे स्पष्ट केलं की, "काही लोक या प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करत आहेत. पण आम्ही न्याय्य निर्णय घेणार आहोत आणि कोणाचंही नाव विनाकारण घेऊन राजकारण करणं योग्य नाही."

# आठवीच्या शिष्यवृत्तीचे वेळापत्रक जाहीर

## 30 नोव्हेंबरपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरता येणार

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी रोजी होणार असून, ३० नोव्हेंबरपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. अलीकडेच शिक्षण विभागाने शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला.**



### ऑफलाइन अर्ज भरता येणार नाही

परीक्षेचे अर्ज ऑनलाइन पद्धतीनेच भरायचे आहेत, ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्याचा आधार क्रमांक, आधार नोंदणी क्रमांक अनिवार्य आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक असणे अनिवार्य नाही. मात्र, विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरल्यास संबंधित विद्यार्थ्याचे बँक खाते काढून त्याची माहिती ऑनलाइन शिष्यवृत्ती प्रणालीमध्ये भरण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. ३१ डिसेंबरनंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाइन किंवा ऑफलाइन अर्ज भरता येणार नाही.

त्यानुसार शिष्यवृत्ती परीक्षा पाचवी, आठवीऐवजी पूर्वीप्रमाणेच चौथी, सातवी या वर्गांसाठी घेतली जाणार आहे,

तर यंदाच्या वर्षी विशेष बाब म्हणून चौथी, पाचवी, सातवी, आठवी या चारही वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे.या पार्श्वभूमीवर राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक, अर्ज प्रक्रिया, विद्यार्थी पात्रता याबाबतचा तपशील अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केला. त्यानुसार, पाचवी, आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा ८ फेब्रुवारी रोजी आयोजित केली जाणार आहे. त्यात पहिल्या सत्रात प्रथम भाषा, गणित या विषयांची, तर दुसऱ्या सत्रात तृतीय भाषा, बुद्धिमत्ता चाचणी या विषयांची परीक्षा होणार आहे. प्रथम भाषा, तृतीय भाषा प्रत्येकी ५० गुणांसाठी, तर बुद्धिमत्ता चाचणी, गणित हे विषय प्रत्येकी १०० गुणांसाठी असणार आहेत.विद्यार्थ्यांचे अर्ज ३० नोव्हेंबरपर्यंत नियमित शुल्कासह, १ ते १५ डिसेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह, १६ ते २३ डिसेंबर या कालावधीत अतिविलंब शुल्कासह आणि २३ ते ३१ डिसेंबर या कालावधीत अतिविशेष विलंब शुल्कासह भरता येणार आहे.

## आमदार लांडगे यांचा पाठपुरावा | मुख्यमंत्री फडणवीस यांचे विशेष लक्ष

# ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता!

## भाजपा महायुती सरकारकडून अधिकृत ‘जीआर’ प्रसिद्ध

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडकरासंह तमाम वारकरी सांप्रदायामध्ये श्रद्धेचे स्थान असलेली इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाला राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे लवकरच प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे. आहे.**



> “इंद्रायणी नदी केवळ धार्मिक श्रद्धेचा विषय नाही, तर आपली संस्कृती, पर्यावरण आणि शहराच्या आरोग्याशी थेट जोडलेली जीवनवाहिनी आहे. नदी सुधार प्रकल्पाला राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता मिळाली. डिसेंबर- 2025 पासून या प्रकल्पाचे काम सुरु व्हावे, अशी अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे यासाठी आभार व्यक्त करतो. या प्रकल्पाद्वारे इंद्रायणी नदीला नवजीवन मिळेल, प्रदूषणमुक्त व सुरक्षित किनारे तयार होतील, तसेच नागरिकांना हरित व सुंदर नदीकाठाचा अनुभव मिळेल. आम्ही हा प्रकल्प वेळेत व गुणवत्तेने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी ‘व्हीजन-2020’ या अभियानामध्ये ‘नमामी इंद्रायणी’ प्रकल्पाची घोषणा केली होती. त्यानंतर 2019 व 2024 च्या विधानसभा निवडणुकीत हा मुद्दा चर्चेत राहिला. राज्य शासनाची पर्यावरण समिती आणि राज्य स्तरीय तांत्रिक समितीच्या मान्यतेसाठी हा प्रकल्प प्रलंबित होता. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पासाठी सकारात्मक पुढाकार घेतला.

दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासाठी सहकार्य केले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्य स्तरीय तांत्रिक समितीची मान्यता देण्यासाठी सर्वोतोपरी निर्णय घेतला. सुमारे 1 हजार 200 कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव होता. आता पहिल्या टप्प्यात 525 कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली त्याचा ‘जीआर’ आज प्रसिद्ध झालेला आहे.

पर्यावरण प्रेमींच्या सूचनांचा अंतर्भाव... शहर आणि परिसरातील पर्यावरण प्रेमी संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींनी नदी सुधार प्रकल्पाचा विकास आराखडा अंतिम करताना महानगरपालिकेच्या MASTER PLAN मध्ये दर्शवल्यानुसार विविध ठिकाणी 60 एमएलडी क्षमतेचे मैलाशुद्धीकरण केंद्र सदर कामामध्ये प्रस्तावित केले आहे. तसेच, WATER ATM, PUBLIC TOILET, STREET FURNITURE, CHAIN LINK FENCING COMPOUND WALL आणि बायोडायव्हर्सिटी पार्क इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. त्याला राज्य सरकारच्या वतीने प्रशासकीय मान्यता मिळाली. त्याचे ‘मिनिट्स’ महापालिका प्रशासनाला मिळाले आहेत. केंद्र सरकारच्या अमृत- 2 उपक्रमांतर्गत या प्रकल्पाचे काम होणार आहे.

# प्लॅस्टिक बॉटल क्रशर उपक्रमाला घरघर

## 16 पैकी 13 मशीन बंद; तीन मशीनचा वापरच नाही

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: महापालिकेच्या वतीने पर्यावरण संरक्षण आणि प्लॅस्टिकचा वापर कमी करण्याच्या हेतूने २४ लाख रुपये खर्च करून १६ ठिकाणी प्लॅस्टिक बॉटल क्रशर मशीन बसविल्या आहेत. या उपक्रमातून नागरिकांना वापरलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या क्रश करून पुनर्वापरास उपयुक्त बनविण्याचा हेतू होता. मात्र, काही महिन्यांतच हा उपक्रम फेल ठरल्याचे दिसून येत आहे.**



१६ मशीनपैकी १३ मशीन बंद पडल्या आहेत. तर, तीन मशीनचा वापर होत नाही.

महापालिकेची देखभाल यंत्रणा पूर्णतः ठप्प झाल्याने करदात्यांचा लाखो रुपयांचा निधी अक्षरशः वाया गेला आहे. हा उपक्रम ठेकेदार पोसण्यासाठी आहे की नागरिकांच्या व पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नागरिकांनी वापरलेल्या पाण्याच्या व थंड पेयांच्या बाटल्या थेट मशीनमध्ये टाकाव्यात. मशीन त्या बाटल्या क्रश करून लहान स्वरूपात रूपांतरित करेल आणि त्यातून मिळालेल्या प्लॅस्टिकचा पुनर्वापर करून कचरा कमी करता येईल. तसेच, स्वच्छतेलाही हातभार लागेल, असा हेतू या मशीन बसविण्यामागे होता. सुरुवातीला काही ठिकाणी या मशीन कार्यरत होत्या. मात्र, काही महिन्यांतच देखभालीअभावी आणि तांत्रिक बिघाडामुळे त्या बंद पडू लागल्या आहेत. सध्या बहुतेक मशीन धूळखात कचऱ्याने भरलेल्या आणि वापरात नसलेल्या अवस्थेत पडल्या आहेत.

एप्रिल २०२२ मध्ये झालेल्या खरेदीत एका मशीनची किंमत १ लाख ४९ हजार रुपये, तर १६ मशीनवर एकूण २३ लाख ८४ हजार रुपयांचा खर्च झाला होता.

आता या मशीन निष्क्रिय अवस्थेत पडल्यामुळे करदात्यांच्या पैशांचा सरळ सरळ अपव्यय झाल्याचे चित्र आहे. प्लॅस्टिक प्रदूषण हा वाढता धोका आहे. शहरात आधीच बसविलेली साधने वापरात आणणे, ही काळाची गरज आहे. प्रशासनाने देखभालीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली पाहिजे. केवळ प्रकल्प सुरू करणे गरजेचे नाही, तर त्याची सातत्यपूर्ण अंमलबजावणी करणेही तितकेच गरजेचे आहे.

# आता दीर्घकालीन उपायच गरजेचा..!




**आठवडाभरापूर्वी १३ व आता २९ नक्षलींना ठार करून सर्वाधिक प्रभावित क्षेत्र अशी ओळख असलेल्या बस्तरमधील सुरक्षा दलांनी चोख कामगिरी बजावली असली तरी या समस्येच्या समूळ उच्चाटनाचे काय हा गेल्या चाळीस वर्षांपासून उपस्थित होणारा प्रश्न मात्र कायम आहे.**

ऐन निवडणुकीच्या तोंडावर छत्तीसगडमधील कांकेर जिल्ह्यात झालेली ही चकमक व त्यात सुरक्षा दलाला मिळालेले यश प्रशासनाचा हुरूप वाढवणारे असले तरी यावरच्या दीर्घकालीन उपायाचे काय? शस्त्रांच्या बळावर शत्रूंचा नायनाट करणे हा शौर्य दाखवण्याचा प्रकार असला तरी विकासाची जबाबदारी असलेल्या सरकारने सुरक्षा दलांच्या भरवशावर कित्येक दशके असे शौर्य दाखवत राहणे योग्य कसे ठरू शकते? नक्षलवादी चळवळीचा बीमोड कायदा व सुव्यवस्था आणि विकास या दोन पातळ्यांवरून करता येऊ शकतो हे सूत्र सरकारने स्वीकारले त्यालाही आता तीन दशके लोटली. दुर्दैव हे की यातल्या कायदा व सुव्यवस्था याच मुद्द्यावर सरकारे भर देत राहिली. त्यामुळे मोठ्या संख्येत नक्षली मारले गेले की यश मिळाले हा समज दृढ होत गेला. ज्या विषमतेतून व असमतोलातून ही समस्या उद्भवली तो दूर करायचा असेल तर विकास हवा याकडे कायमच दुर्लक्ष झाले. त्याचा परिणाम असा की मारले जाणाऱ्या नक्षलीचे चेहरे व नावे



तेवढी बदलत राहिली. हिंसाचार मात्र कायम राहिला. मध्यंतरी मोदी सरकारने नोटाबंदी केली तेव्हा नक्षल चळवळ आता संपणार अशा वल्गना केल्या गेल्या. प्रत्यक्षात त्यांना होणारा अर्थपुरवठा कमी होण्याऐवजी त्यात वाढच झाली हे अलीकडे त्यांच्याकडून जप्त होणाऱ्या अत्याधुनिक शस्त्रसाठ्यावर एक नजर टाकली तरी ते लक्षात येते. एक हजार मीटपर्यंत मारा करू शकणाऱ्या एलएमजी बंदुका, रॉकेट व ग्रेनेड लॉँचर्स ही या जप्तसाठ्यात नव्याने आढळून आलेली शस्त्रे. ती त्यांना कशी मिळाली वा त्यांनी ती कुठे तयार केली याचा शोध सरकारी यंत्रणांनी घेतला नाही. नक्षलींचा प्रभाव असलेल्या भागात जितकी विकासकामे जास्त तेवढा त्यांना अर्थपुरवठा अधिक हे सर्वश्रुत असलेले सत्य. ही रसद मोडून काढायची असेल तर त्यांचा प्रभाव कमी करून भयमुक्त वातावरण निर्माण करणे गरजेचे. त्यासाठी स्थानिकांचा विश्वास जिंकणे आवश्यक. त्यासाठी प्रशासनाचे बळकटीकरण करणे महत्त्वाचे. याकडे लक्ष न देता केवळ चकमकीत नक्षली मारत राहणे हा सरकारचा प्राधान्यक्रम राहिला. त्यामुळे वर्षांनुवर्षे सुरू असलेला हा हिंसाचार कायम आहे. दोन दिवसांपूर्वीच भंडाऱ्यात झालेल्या सभेत देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी नक्षलवाद संपवला असे विधान केले. तसे असेल तर इतक्या मोठ्या संख्येने मारले जाणारे नक्षली जंगलात येतात कुठून? अशा हिंसक समस्येचे मूळ शोधून त्यावर उपाय करण्याऐवजी डावा म्हणजे विरोधी विचाराचा माणूस मारला गेला की आनंद व्यक्त करणे हे सरकारचे धोरण कसे असू शकते? बंदुकीच्या बळावर लोकशाही व्यवस्था कुणीही उलथवून टाकू शकत नाही हे या चळवळीच्या प्रभावक्षेत्रातील जनतेला पटवून द्यायचे असेल तर सरकारी धोरणातही वेगळा विचार हवा. पण हीच गोष्ट सरकार लक्षात घ्यायला तयार नाही. अशा हिंसाचारात मारले जाणारे नक्षली असो वा जवान, ते स्थानिकच असतात. यातून होणाऱ्या असंतोषाने या चळवळीला बळ मिळत जाते हा अनुभव आहे. छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार होते तेव्हा नक्षलवाद वाढला असा आरोप मोदी व शहा यांनी सातत्याने केला. आता भाजपचे सरकार असूनही त्याची वाढ खुंटलेली नाही हे ताज्या चकमकींनी दाखवून दिले. मग आरोपाचे काय? मुळात या समस्येकडे राजकीय दृष्टिकोनातून बघणेच चूक. दरवर्षी उन्हाळ्यात जंगलात नक्षली 'टॅक्टिकल काऊंटर अफेन्सिव्ह कॅम्पेन (टीसीओसी) राबवतात. तेंदूपाने गोळा करण्याच्या निमित्ताने स्थानिकांचा वाढलेला वावर त्यांच्या फायद्याचा ठरतो. अलीकडच्या काही वर्षांत या काळात होणाऱ्या हिंसाचारात सुरक्षा दलांना यश मिळणे समाधानाची बाब असली तरी परिस्थिती सदैव अनुकूल राहील याची खात्री देता येत नाही. हा धोका लक्षात घेऊन सरकारने पावले उचलणे गरजेचे. देश लोकशाहीचा उत्सव असलेल्या निवडणुकीत आनंदाने सहभागी होत असताना ती मोडून काढण्याची भाषा करणाऱ्या या चळवळीने व तिला पाठिंबा देणाऱ्यांनी या हिंसाचाराकडे डोळसपणे बघणे आवश्यक आहे.

## प्रासंगिक »

### 'पूर्व'लक्ष्यी प्रभाव!

***आसिआन' देशांशी निव्वळ सांस्कृतिक किंवा सामरिक बांधिलकी वाढवण्यापेक्षा, व्यापारवाढीसाठी आपल्या उत्पादनांत गुणात्मक आणि संख्यात्मक वृद्धी आणावी लागेल***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार २०१४ मध्ये पहिल्यांदा सत्तेवर आले, त्या वेळी 'पूर्वाभिमुखता' (लुक ईस्ट- ॲक्ट ईस्ट) हा आपल्या परराष्ट्र धोरणाचा पाया असेल, असे या सरकारतर्फे जाहीर झाले. त्यानुसार सुरुवातीस जपान, नंतर बांगलादेश आदी देशांशी संबंध सुधारण्यावर भर दिला गेला. कालौघात भारताचा परराष्ट्रीय धोरणाचा अवकाश प्रथम चीन आणि आता अमेरिकेने व्यापला हे स्वाभाविकच. पण या प्रदीर्घ काळात एका महत्त्वाच्या राष्ट्रसमूहाकडे जरा दुर्लक्ष झाले, तो म्हणजे आग्नेय आशियाई देशांचा समूह अर्थात आसिआन. डोनाल्ड ट्रम्पप्रणीत टॅरिफ टगेगिरीच्या युगात नवे भागीदार शोधणे आणि जुन्या भागीदाऱ्या पुनरुज्जीवित करणे अत्यावश्यक बनले आहे.

सदानंद दाते हे चुकीची कामे करण्यासाठी होणाऱ्या विनंतीला बधणारे नाहीत, हे जाणकारांना माहीत आहे. सत्तेत असलेल्यांना असे अधिकारी 'सोयी'चे नसतात, हे वास्तव आहे. भारतीय पोलीस सेवेने आपल्या ७० वर्षांमध्ये जी तेजस्वी रत्ने दिली, त्यापैकी एक आहेत.

## आमच्या उत्तराधिकाऱ्यांपुढचा काळ कठीण!

महाराष्ट्र केडरचे सदानंद दाते. राज्यघटना आणि कायद्यावरील निष्ठेपेक्षा सत्तेत असलेल्या पक्षावरील निष्ठेला प्राधान्य दिले जात असतानाच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून काम केले आहे. माझ्या पिढीच्या अधिकाऱ्यांवर ही वेळ आली नव्हती. ते ज्या समाजातून आले आहेत, तो सत्य आणि न्याय, मूल्य प्रणाली, साधी राहणी, उच्च विचारसरणी यासाठी ओळखला जातो. सदानंद दाते यांच्या व्यक्तिमत्त्वात ते सर्व गुण सामावलेले आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी भारतीय पोलीस सेवेत प्रवेश केला. लहानपणापासून असलेली बेताची परिस्थिती त्यांच्या या ध्येयाच्या आड आली नाही. सर्वत्र कौतुकास्पद असलेल्या या माणसाची मुंबई महानगराच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती झाली असती तर मुंबईकरांना खरोखरच आवडले असते. पण सदानंद दाते हे चुकीची कामे करण्यासाठी होणाऱ्या विनंतीला बधणारे नाहीत,



हे जाणकारांना माहीत आहे. त्यामुळे नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी म्हणजेच एनआयएचे महासंचालक दिनकर गुप्ता यांच्या जागेवर सदानंद दाते यांची नियुक्ती व्हावी यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते. अलीकडेच मी 'द बॅकरूम मिश्चिफ मेकर्स' हा निवृत्त आयएएस अधिकारी मॅथ्यू जॉन यांचा लेख वाचला. या लेखात त्यांनी नोकरशाहीची, विशेषत: भारतीय पोलीस सेवा आणि भारतीय महसूल सेवा यांच्याशी संबंधित यंत्रणा आणि त्यातील अधिकाऱ्यांवर कठोर टीका केली आहे. या यंत्रणा राजकारण्यांनी वाकायला सांगितले तर रांगायला सुरुवात करतात, असे लेखकाचे म्हणणे आहे. या लेखात ईडीचा उल्लेख आहेच शिवाय सीबीआय आणि एनआयएचाही उल्लेख आहे. तीन-चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील आणखी एक उत्कृष्ट आयपीएस अधिकारी सुबोध जयस्वाल यांची सीबीआयच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली होती. त्यांनी फारसा गाजावाजा न करता काम केले. त्यांना मुदतवाढ मिळाली नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर आणखी काही पदे आणि इतर फायदे मिळाले नाहीत. ही खरे तर त्यांच्या सचोटीला मानवंदनाच आहे. जे सत्तेपुढे झुकतात, त्यांना त्याचे बक्षीस मिळते, हे एक उघड सत्य आहे. सुबोध जयस्वाल कोणापुढेच झुकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. सदानंद दाते यांच्या नेतृत्वाखालील एनआयएदेखील कितीही दबाव आला, तो कितीही असह्य झाला तरीही कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करणार नाही, याची मला खात्री आहे. सदानंद दाते हा एक असा माणूस आहे ज्याने जबाबदारी स्वीकारण्याआधीच त्याच्या अटी निश्चित केल्या असतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## शेतकऱ्यांची लूट शासकीय खरेदीचे धोरणच ठरेना

# बाजारपेठेत सोयाबीनला कमी दर!

### कापसाला हमीभावापेक्षा कमी दर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अतिवृष्टीच्या तडाख्यातून वाचलेले सोयाबीन व कापूस आता बाजारात येत असून या दोन्ही प्रमुख नगदी पिकांची खरेदी सध्या हमीभावापेक्षाही कमी दराने होत आहे. सोयाबीनचा हमीभाव ५ हजार ३२८ रुपये असताना बाजारात खासगी व्यापाऱ्यांकडून ४ हजार रुपये प्रतिक्विंटलपेक्षा कमी दराने ही खरेदी सुरू आहे तर कापसाचा हमीभाव ८ हजार रुपये प्रति क्विंटल असताना कापसाची खासगी खरेदी क्विंटलला सात हजार रुपयांवरच रेंगाळली आहे.**



यावर्षी अतिवृष्टीचा सोयाबीनला मोठा फटका बसलेला आहे. उत्पादकतेवर तर अतिवृष्टीचा परिणाम झालाच पण शेतमालाच्या गुणवत्तेवरही झाला आहे. शेतकऱ्यांचे सोयाबीन बाजारात आले असताना शासनाच्या खरेदीचे मात्र अजून कोणतेच धोरण निश्चित नाही. ३० ऑक्टोबरपर्यंत शासकीय हमीभावात सोयाबीनची खरेदी केंद्र सुरू होतील असे सरकारच्या वतीने सांगितले जात असले तरी अजूनपर्यंत यासंदर्भात कोणत्याही सूचना संबंधितांना नाहीत. त्यातच सुरुवातीला नोंदणी आणि त्यानंतर खरेदी असा प्रकार होत असल्याने सध्या अडलेले शेतकरी मिळेल त्या किमतीत सोयाबीन विकून मोकळे होत आहेत.जिल्ह्यातील अकरा बाजार समित्यांमध्ये या हंगामातील सोयाबीनची खरेदी होत असून कुठेच ती हमीभावाने होत नसल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे या प्रकारावर जिल्हा उपनिबंधकांचे कोणतेही नियंत्रण नाही. परिणामी क्विंटलमागे शेतकऱ्यांना दीड हजार रुपयांचा फटका सोयाबीन या पिकात सहन करावा लागत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक अडचण दूर करण्यासाठी मिळेल त्या दरात सोयाबीन विकावे लागले आहे.दुसरीकडे बाजारात शेतकऱ्यांचा कापूस विक्रीसाठी आला असून कापसाची खरेदी खासगी बाजारात सात हजार ते साडेसात हजार रुपये प्रति क्विंटलने होत आहे. दिवाळी पाडव्याच्या मुहूर्तावर खासगी कापूस खरेदीला प्रारंभ झाला असून सात हजार २०० रुपये या भावाने कापसाची खरेदी सुरू झाली. अतिवृष्टीचा फटका कापसाला बसल्याने कापसाच्या गुणवत्तेवरही त्याचा परिणाम झाला आहे. कापूस भिजल्याने काही ठिकाणी तो पिवळसर दिसत असून व्यापाऱ्यांनी असा

### क्विंटलमागे दीड हजारचा फटका

विशेष म्हणजे या प्रकारावर जिल्हा उपनिबंधकांचे कोणतेही नियंत्रण नाही. परिणामी क्विंटलमागे शेतकऱ्यांना दीड हजार रुपयांचा फटका सोयाबीन या पिकात सहन करावा लागत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक अडचण दूर करण्यासाठी मिळेल त्या दरात सोयाबीन विकावे लागले आहे. दुसरीकडे बाजारात शेतकऱ्यांचा कापूस विक्रीसाठी आला असून कापसाची खरेदी खासगी बाजारात सात हजार ते साडेसात हजार रुपये प्रति क्विंटलने होत आहे.

कापूस कमी दरात घेणे सुरू केले आहे. राज्य सरकारचे कापूस खरेदीबाबत कोणतेही धोरण ठरले नाही तर अजून 'सीसीआय'ची खरेदी केंद्र सुरू झाली नाहीत. जिल्ह्यात सर्वत्र महत्त्वाच्या ठिकाणी 'सीसीआय'ची कापूस खरेदी न होता ती विशिष्ट ठिकाणी होत आहे. कापूस खरेदीत व्यापाऱ्यांची मनमानी शेतकऱ्यांना सहन करावी लागत आहे. सध्या कापूस व सोयाबीन या दोन प्रमुख नगदी पिकांची आवक सुरू झाली असून दोन्ही पिकांना बाजारपेठेत हमीभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची अक्षरशः लूट होत आहे.यावर्षी अतिवृष्टीचा सोयाबीनला मोठा फटका बसलेला आहे. उत्पादकतेवर तर अतिवृष्टीचा परिणाम झालाच पण शेतमालाच्या गुणवत्तेवरही झाला आहे. शेतकऱ्यांचे सोयाबीन बाजारात आले असताना शासनाच्या खरेदीचे मात्र अजून कोणतेच धोरण निश्चित नाही. ३० ऑक्टोबरपर्यंत शासकीय हमीभावात सोयाबीनची खरेदी केंद्र सुरू होतील असे सरकारच्या वतीने सांगितले जात असले तरी अजूनपर्यंत यासंदर्भात कोणत्याही सूचना संबंधितांना नाहीत. त्यातच सुरुवातीला नोंदणी आणि त्यानंतर खरेदी असा प्रकार होत असल्याने त.जिल्ह्यातील अकरा बाजार समित्यांमध्ये या हंगामातील सोयाबीनची खरेदी होत असून कुठेच ती हमीभावाने होत नसल्याचे दिसून येत आहे.

## बालनाट्य स्पर्धेचे आयोजन खासगी संस्थेकडे

### बालरंगभूमी परिषदेकडे जबाबदारी; कलावंत संघटनांचा विरोध

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारचे सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित राज्य बालनाट्य स्पर्धा व अपंग बालनाट्य स्पर्धेच्या समन्वयाची जबाबदारी बालरंगभूमी परिषद, मुंबई या संस्थेकडे देण्यात आली आहे. या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेसचा (अजित पवार गट) चित्रपट व सांस्कृतिक विभाग तसेच समांतर रंगभूमी कलावंत संघटनेने विरोध केला आहे.**

या संस्थांनी तसे पत्र सांस्कृतिक कार्य संचालनालयाला पाठवले आहे. दरम्यान बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत यांनी मात्र हा विरोध अभ्यास न करता, माहिती न घेता होत असल्याचा दावा केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राज्य सरकारमार्फत या राज्य स्पर्धांचे सुरळीतपणे आयोजन केले जाते. या स्पर्धेच्या संयोजनासाठी सरकारकडे सक्षम यंत्रणा आहे.असे असताना यंदा बालनाट्य स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी बाहेरील संस्थेला का देण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. यंदाची ही जबाबदारी बालरंगभूमी परिषद या संस्थेला देण्यात आली आहे. संचालनालयाने चार ऑगस्ट रोजी घेतलेल्या या निर्णयानुसार स्पर्धेसाठी



समन्वयक म्हणून बालरंगभूमी परिषदेची नियुक्ती केली आहे. या संस्थेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत या राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या पत्नी आहेत. हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धा, बालनाट्य स्पर्धा, अपंग बालनाट्य स्पर्धेचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत केले जाते. त्यासाठी प्रत्येक केंद्रावर समन्वयकाची नियुक्ती केली जाते. या समन्वयकांवर स्पर्धांची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी असते.

### दोन्ही स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात

सांस्कृतिक विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विश्वस्त शरद पवार यांना पत्र पाठवून या निर्णयात हस्तक्षेप करावा अशी मागणी केली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या या निर्णयामुळे या दोन्ही स्पर्धा वादाच्या भोवऱ्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मात्र यावेळी बालनाट्य स्पर्धा व अपंग बालनाट्य स्पर्धेच्या स्थानिक समन्वयासाठी बालरंगभूमीच्या शाखा समन्वयक म्हणून काम करतील, असा निर्णय जाहीर केला आहे. बालरंगभूमी परिषदेने केलेल्या मागणीनुसार हा निर्णय घेण्यात येत असल्याचेही पत्रात म्हटले आहे. समन्वयासह बालरंगभूमी परिषदेमार्फत शिफारस करण्यात आलेल्या परीक्षकांचा नियुक्तीसाठी प्राधान्याने विचार केला जाणार असल्याचे व स्थानिक बालरंगभूमी परिषदेचे अध्यक्ष व इतर सदस्यांना बालनाट्य स्पर्धेला आमंत्रित करणे तसेच बालनाट्य शिबिराचे संयोजन बालरंगभूमी परिषदेमार्फत करण्याचा निर्णयही या पत्रातून जाहीर करण्यात आला .

अमेरिकेच्या धोरणांबद्दल नाराजी

## आशियायी परिषदेत परराष्ट्रमंत्र्यांची अमेरिकेवर टीका

# व्यापार तत्त्वांची निवडक अंमलबजावणी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**"ऊर्जा व्यापार दिवसेंदिवस संकुचित होत चालला आहे. व्यापारी तत्त्वे निवडक पद्धतीने लागू केली आहेत आणि जे बोलले जाते, त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होतेच असे नाही,"असे प्रतिपादन परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी पूर्व आशियायी शिखर परिषदेत (ईएएस) केले.**

## अमेरिकेच्या धोरणांबद्दल नाराजी



जयशंकर यांनी रविवारी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांची भेट घेतल्यानंतर काही तासांनी 'ईएएस'मध्ये बोलताना अमेरिकेच्या धोरणांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यामागे अमेरिकेने भारतावर लादलेल्या अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्काची पार्श्वभूमी होती. दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध लादण्याच्या चीनच्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी पुरवठा साखळी आणि त्याचा जागतिक पातळीवर झालेला परिणाम यावर भाष्य केले. ते म्हणाले, पुरवठा साखळीच्या विश्वासार्हतेवर चिंता निर्माण करणारी स्थिती आहे. तंत्रज्ञानातील प्रगती अतिशय स्पर्धात्मक झाली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या शोध अधिक स्पर्धात्मक झाला आहे. जग या नव्या परिस्थितीला अपरिहार्यतेने प्रतिसाद देईल. त्यासाठी आवश्यक तडजोडी होतील. नव्या संधी निर्माण होतील. समस्यांवर लवचीक उपाय शोधले जातील. जगामधील बहुध्रुवीयता वाढत जाणार असून या सर्व स्थितीवर जागतिक स्तरावर अतिशय गांभीर्याने चर्चा व्हायला हवी, असे आवाहन जयशंकर यांनी केले.दहशतवादाच्या मुद्द्यावरही जयशंकर यांनी भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. ते म्हणाले, "जगाला दहशतवादाचा धोका आहे. दहशतवादाबाबत जगाने 'शून्य सहिष्णूता' दाखवायली हवी. तेथे द्विधा मनस्थिती नको. दहशतवादाविरोधात स्वतःचे संरक्षण करण्यासाठीच्या आमच्या हक्कामध्ये कधीही तडजोड केली जाऊ शकत नाही."ऊर्जा व्यापार हा संकुचित होत चालला आहे. त्याचा परिणाम बाजार विस्कळीत होण्यात झाला आहे. व्यापारी तत्त्वे निवडक पद्धतीने लागू केली जात आहेत आणि जे बोलले जाते, त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होतेच असे नाही. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर जयशंकर म्हणाले, 'जगाला दहशतवादाचा धोका आहे. दहशतवादाबाबत जगाने 'झिरो टॉलरन्स' दाखवायला हवा. तेथे द्विधा मनस्थिती नको. दहशतवादाविरोधात स्वतःचे संरक्षण करण्यासाठीच्या आमच्या हक्कामध्ये कधीही तडजोड केली जाऊ शकत नाही.'क्वालालंपूर : परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांच्याबरोबर चर्चा केली. अमेरिकेने भारतावर लादलेल्या वाढीव करांच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा झाली. द्विपक्षीय संबंध, प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती जयशंकर यांनी समाजमाध्यमात टिप्पणी करून दिली. दोन्ही नेत्यांमध्ये भारत-अमेरिकेतील संभाव्य व्यापार करारावरही चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. रुबिओ यांच्याबरोबर मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम, सिंगापूरचे परराष्ट्रमंत्री व्हिव्हिआन बालकृष्णन आणि थायलंडचे परराष्ट्रमंत्री सिहसाक फुआंगकेतकेवँ यांची भेट घेतली. जयशंकर यांनी न्यूझीलंडचे पंतप्रधान ख्रिस्तोफर लक्सॉन आणि मलेशियाचे परराष्ट्रमंत्री महंमद हाजी हसन यांचीही स्वतंत्रपणे भेट घेतली. क्वालालंपूर : जबरदस्तीऐवजी संवाद साधा आणि एकमेकांचा सामना करण्याची वेळ आली, तर सहकार्य करा, असे आवाहन मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी हिंद-प्रशांत भागातील नेत्यांना सोमवारी 'ईएएस'ला सुरुवात करताना केले. अमेरिका-चीन यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केले. अन्वर इब्राहिम म्हणाले, 'आज आपण आपली उद्दिष्टे ठरवली पाहिजेत. सकारात्मकतेने संबंध प्रस्थापित करण्यासाठीच्या तत्त्वांचा पुरस्कार आपण केला पाहिजे. जागतिक शांतता, सुरक्षा, बहुस्तरावरील संवाद, आंतरराष्ट्रीय कायदा यावर आपण भूमिका निश्चित करायला हवी.'

### खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध

जयशंकर यांनी रविवारी अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांची भेट घेतल्यानंतर काही तासांनी 'ईएएस'मध्ये बोलताना अमेरिकेच्या धोरणांबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यामागे अमेरिकेने भारतावर लादलेल्या अतिरिक्त २५ टक्के आयातशुल्काची पार्श्वभूमी होती.दुर्मीळ खनिजांच्या निर्यातीवर निर्बंध लादण्याच्या चीनच्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी पुरवठा साखळी आणि त्याचा जागतिक पातळीवर झालेला परिणाम यावर भाष्य केले.

# आयोगाची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात

## 12 राज्यांतील 'एसआयआर'वर काँग्रेसचे प्रश्नचिन्ह

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने देशातील १२ राज्यांत मतदार याद्यांच्या 'विशेष सखोल फेरतपासणी' (एसआयआर) मोहिमेची घोषणा सोमवारी केली. या प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत काँग्रेसने निवडणूक आयोगाचा हेतू आणि विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडल्याची टीका केली आहे. तसेच मतदार किंवा विरोधी पक्ष या प्रक्रियेवर समाधानी नसल्याचेही म्हटले आहे.**

'एसआयआर 'वरून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अद्याप आम्हाला मिळाली नाहीत. परिस्थिती अशी आहे की या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाला अनेकदा हस्तक्षेप करावा लागला. 'एसआयआर' प्रकरणावरून निवडणूक आयोगाला आपली कठपुतळी बनवणाऱ्या भाजपचा हेतू आधीच संपूर्ण देशासमोर उघड झाला आहे, असा आरोप काँग्रेसच्या माध्यम आणि प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेरा यांनी 'एक्स'वरील चित्रवाणी संदेशातून केला आहे.'एसआयआर' मोहीम जेव्हा राबवली जाते त्यात निवडणूक आयोगाचे कर्मचारी घरोघरी जातात, नवीन मतदार जोडतात आणि जी नावे वगळायची आहेत, ती



वगळतात. परंतु बिहारमध्ये एकाही मतदाराची नोंदणी झालेली नाही. त्याचवेळी 'एसआयआर'अंतर्गत तब्बल ६५ लाख मतदारांची नावे वगळली आहेत. त्यावरून प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत,' असेही खेरा म्हणाले. आता १२ राज्यांमध्ये 'एसआयआर'ची घोषणा करण्यात आली आहे. हा लोकशाहीविरोधात मोठा कट असून, नागरिकांचे हक्क हिरावून घेण्याचे षड् यंत्र रचण्यात येत असल्याचा आरोप खेरा यांनी केला आहे. बिहारमध्ये 'एसआयआर' पूर्ण झाल्यानंतरही घुसखोरीच्या मुद्द्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने मौन बाळगले होते. सोमवारी दुसऱ्या टप्प्यातील 'एसआयआर'ची घोषणा करतानाही केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांनी या मुद्द्याला बगल दिली. बिहारमध्ये नेमके किती घुसखोर सापडले, या प्रश्नाकडे ज्ञानेश कुमार यांनी दुर्लक्ष केले. सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ज्ञानेश कुमार यांनी देशातील घुसखोरांना मतदारयाद्यांमधून वगळले जाईल, असे स्पष्ट केले. खरोखर घुसखोर होते का व केंद्र सरकारमध्ये वरिष्ठ स्तरावर यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाने चर्चा केली का आणि या संदर्भातील आकडेवारी प्रसिद्ध केला जाईल का, या प्रश्नावरही केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांनी मौन बाळगले.

### 'एसआयआर' मोहीम जेव्हा राबवली

'एसआयआर' प्रकरणावरून निवडणूक आयोगाला आपली कठपुतळी बनवणाऱ्या भाजपचा हेतू आधीच संपूर्ण देशासमोर उघड झाला आहे, असा आरोप काँग्रेसच्या माध्यम आणि प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेरा यांनी 'एक्स'वरील चित्रवाणी संदेशातून केला आहे.'एसआयआर' मोहीम जेव्हा राबवली जाते.

# रणवीरपेक्षा जबरदस्त डान्स करतो 'जवान'चा दिग्दर्शक अॅटली



बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह त्याच्या अभिनयाबरोबर एनर्जेटिक डान्समुळे नेहमी चर्चेत असतो. त्याच्या एनर्जीचं कायम कौतुक केलं जात. पण सध्या सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे; ज्यामध्ये रणवीरपेक्षा 'जवान' चित्रपटाचा दिग्दर्शक अॅटली एनर्जेटिक डान्स करताना दिसत आहे. रणवीर सिंह व अॅटलीचा हा व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर 'मानव मंगलानी'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक शंकर यांची मुलगी ऐश्वर्या हिच्या रिसेप्शन सोहळ्यातला हा व्हिडीओ आहे. ज्यामध्ये अॅटलीचा जबरदस्त डान्स पाहायला मिळत आहे.व्हिडीओत, सुरुवातीला रणवीर अॅटलीला डान्स करण्यासाठी तयार करताना दिसत आहे. त्यानंतर अॅटली जो काही भन्नाट डान्स करू लागतो रणवीर त्याच्याकडे पाहतच राहतो. मग दोघं एकत्र मिळून जबरदस्त डान्स करायला लागतात. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.रणवीर व अॅटलीच्या या व्हिडीओला ३ लाखांहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. तर १० हजारांहून अधिक लाइक्स मिळाले आहेत. तसेच नेटकऱ्यांनी देखील भरभरून प्रतिक्रिया दिल्या आहेत.बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह त्याच्या अभिनयाबरोबर एनर्जेटिक डान्समुळे नेहमी चर्चेत असतो. त्याच्या एनर्जीचं कायम कौतुक केलं जात. पण सध्या सोशल मीडियावर असा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे; ज्यामध्ये रणवीरपेक्षा 'जवान' चित्रपटाचा दिग्दर्शक अॅटली एनर्जेटिक डान्स करताना दिसत आहे.

# पापाराझींवर भडकली श्रियाची वृद्ध चाहती

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री श्रिया सरन सध्या चर्चेत आहे. श्रियाच्या एका व्हिडीओने सोशल मीडियावर धुमाकूळ घातलाय. नुकत्याच 'शोटाईम' या वेब सीरिजमध्ये इमरान हाश्मीबरोबर झळकलेल्या या अभिनेत्रीने 'दो और दो प्यार' चित्रपटाच्या प्रीमियरला हजेरी लावली होती. त्यादरम्यान श्रियाच्या एका वयोवृद्ध चाहतीने पापाराझींना चांगलेच सुनावले. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. १७ एप्रिलला श्रिया सरन 'दो और दो प्यार' चित्रपटाच्या प्रीमियरला पोहोचली होती. पापाराझींसाठी पोज देताना श्रियाची वृद्ध चाहती तिथे आली. श्रियाने त्यांना सांगितलं की, या पापाराझींना जरा समजवा. तेवढ्यात श्रियाची वृद्ध चाहती पापाराझींना ओरडली आणि म्हणाली, "बस करा आता, किती गरम होतंय बिचाऱ्या मुलीला. एकतर तिने असे कपडे घातलेत आणि एवढी गरमी होतेय. ती एसीमध्ये राहणारी मुलगी आहे. तिला अशा कपड्यांमुळे आणखी गरम होत असणार", असं बोलून वृद्ध चाहतीने श्रियाला तिथून जायला सांगितलं.श्रिया आणि तिच्या चाहतीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय. या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर अनेकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. "ही आंटी आहे तरी कोण?" कमेंट सेक्शनमध्ये असा प्रश्न अनेकांनी विचारला.

# मसाबा गुप्ता होणार आई



प्रसिद्ध फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता आणि अभिनेता सत्यदीप मिश्रा यांनी २७ जानेवारी २०२३मध्ये लग्नगाठ बांधली. भव्य लग्नसोहळा न ठेवता या कपलने कुटुंबातील काही सदस्य आणि जवळच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रित करून कोर्ट मॅरेज केलं होतं. लग्नाच्या एका वर्षानंतर आता या कपलने चाहत्यांना गुड न्यूज दिली आहे. आज (१८ एप्रिल २०२४) मसाबा आणि सत्यदीप मिश्राने त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत दोघं लवकरच आई-बाबा होणार असल्याची बातमी जाहीर केली. या पोस्टमध्ये पहिल्या फोटोत गरोदर असलेल्या महिलेचा इमोजी वापरला आहे. तर दुसऱ्या फोटोत मसाबा आणि सत्यदीपसारखे दिसणारे इमोजी वापरले आहेत. तिसऱ्या फोटोत होणाऱ्या बाळाच्या आई-बाबांचा ब्लॅक अॅड व्हाईट फोटो शेअर केला आहे.या खास पोस्टला कॅप्शन देत मसाबाने लिहिलं, "आमच्या आयुष्यात येण्यासाठी दोन इवल्याशा पायांची वाटचाल सुरू झाली आहे. कृपया प्रेम, आशीर्वाद आणि केळ्याचे वेफर्स पाठवा" "हॅशटॅग- लवकरच एक लहान बाळ येणार आहे. आईबाबा" असं हॅशटॅग मसाबाने वापरलं आहेदरम्यान, मसाबा गुप्ता आणि सत्यदीप मिश्रा यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, मसाबा गुप्ताचं पहिलं लग्न निर्माते मधु मंतेना यांच्याशी झालं होतं. २०१५ मध्ये त्यांचं लग्न झालं आणि २०१९ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. तर सत्यदीप मिश्राचंही हे दुसरं लग्न आहे. सत्यदीप मिश्राचं आणि अभिनेत्री अदिती राव हैदरी यांचं लग्न झाल्याची बातमी समोर आली होती. तथापि, त्या दोघांनी कधीही वैवाहिक स्थितीबद्दल भाष्य केलं नाही. २०१३ मध्ये अदितीने खुलासा केला होता की ते दोघं वेगळे झाले आहेत.प्रसिद्ध फॅशन डिझायनर मसाबा गुप्ता आणि अभिनेता सत्यदीप मिश्रा यांनी २७ जानेवारी २०२३मध्ये लग्नगाठ बांधली. भव्य लग्नसोहळा न ठेवता या कपलने कुटुंबातील काही सदस्य आणि जवळच्या मित्र-मैत्रिणींना आमंत्रित करून कोर्ट मॅरेज केलं होतं. लग्नाच्या एका वर्षानंतर आता या कपलने चाहत्यांना गुड न्यूज दिली आहे. आज (१८ एप्रिल २०२४) मसाबा आणि सत्यदीप मिश्राने त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्ट शेअर करत दोघं लवकरच आई-बाबा होणार असल्याची बातमी जाहीर केली.

# सुशांतच्या जाण्याचं दु:ख कुणालाच नाही

दिग्दर्शक दिबाकर बॅनर्जींनी दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूतबरोबर 'डिटेक्टिव्ह व्योमकेश बक्षी' या चित्रपटात काम केलं होतं. हा चित्रपट फारसा यशस्वी झाला नाही, पण यात सुशांतने केलेल्या कामाचं खूप कौतुक झालं होतं. 'लव्ह सेक्स और धोका २' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत आता दिबाकर यांनी सुशांतचे निधन आणि त्यानंतर निर्माण झालेल्या वातावरणावर आपलं मत मांडलं आहे. जून २०२० मध्ये सुशांतचा मृतदेह त्याच्या घरातून सापडला होता. त्यावेळी त्याने आत्महत्या केल्याचं म्हटलं गेलं, नंतर मात्र सुशांतबरोबर काहीतरी घडलं असावा असा संशय असल्याने या प्रकरणाचा तपास आधी मुंबई पोलिसांकडे आणि नंतर सीबीआयकडे सोपवण्यात आला. या संपूर्ण प्रकरणात सुशांतला कोणीही मिस करताना दिसलं नाही, असं दिबाकर यांनी म्हटलं आहे.दिबाकर यांनी सुशांतच्या निधनानंतरचे दिवस आठवले. एका तरुण अभिनेत्याच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याऐवजी लोकांचे लक्ष त्याच्या मृत्यूपर्यंत कारणीभूत असलेल्या गोष्टींवर होते. "त्याच्या निधनानंतर त्याच्या मृत्यूबद्दल बऱ्याच गोष्टी सुरू होत्या, पण मी तेव्हा येणाऱ्या बातम्यांमुळे मी या सर्व गोष्टींपासून दूर गेलो. मी सगळं ऐकत होतो, पण एका तरुण अभिनेत्याचं निधन झालंय, असं म्हणताना मला कुणीच दिसलं नाही. मी माझ्या आजुबाजूला कुणालाच त्याच्या निधनावर शोक व्यक्त करताना पाहिलं नाही. लोक त्याच्या निधनात मसालेदार गॉसिप शोधत होते, ते सगळं पाहिल्यावर मला त्या परिस्थितीपासून दूर जावं लागलं, कारण कुणीही सुशांतला गमावल्याबद्दल दुःख व्यक्त करत नव्हतं," असं दिबाकर म्हणाले.दिबाकर म्हणाले की सुशांतच्या यशाबद्दल कोणीही बोलत नव्हतं, सगळे फक्त 'षड्यंत्र, ड्रग्ज, खून' याबाबत बोलत होते. "त्याच्या निधनानंतर शोकसभा कुठे झाल्या? त्याच्या चित्रपटांबद्दल कुठे बोललं गेलं? जे लोक त्याच्यावर प्रेम करत होते, त्यांनी त्याच्या चित्रपटांच स्क्रिनींग ठेवायला पाहिजे होतं. आपण त्याच्या चांगल्या आठवणी का जपत नाही?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. लोकांनी फक्त आपलं दुःख विसरायला त्याच्या निधनाची चर्चा केली, त्यात शोक दिसलाच नाही, असं स्पष्ट मत त्यांनी मांडलं.

# सलमानच्या घरी पोहोचली शिल्पा



अभिनेत्री शिल्पा शेट्टी व तिचा पती राज कुंद्रा यांची ९७.७९ कोटी रुपयांची संपत्ती ईडीने जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. पॉन्झी घोटाळ्याप्रकरणी ईडीने ही कारवाई केली आहे. अभिनेत्रीची संपत्ती जप्त झाल्यानंतर ती तिच्या घरातून सलमान खानच्या घरी जाताना पापाराझींच्या कॅमेऱ्यात कैद झाली आहे.शिल्पा शेट्टी तिची आई सुनंदा यांच्याबरोबर वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील सलमान खानच्या घरी गेली. सलमान खानच्या घरावर तीन दिवसांपूर्वी पहाटे गोळीबार झाला होता. तेव्हापासून अनेक सेलिब्रिटींनी अभिनेत्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली आहे. आता शिल्पाही आईबरोबर सलमानच्या घरी गेली. तिच्या संपत्तीवर ईडीने जप्तीची कारवाई केल्याची बातमी आल्यानंतर ती पहिल्यांदाच घराबाहेर पडली आणि सलमानच्या घरी गेली आहे.अभिनेता सलमान खानच्या घरावर रविवारी पहाटे गोळीबार झाला. या हल्ल्याची जबाबदारी गँगच्या अनमोल बिश्नोईने घेतली होती.

## ३० चेंडू खेळून ४० धावा

## गंभीरचा ट्वेन्टी-२० संघाच्या कर्णधाराला पाठिंबा

# सूर्यकुमारच्या कामगिरीबाबत निश्चिंत!

## वर्षभरापासून अर्धशतक केलेले नाही

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सूर्यकुमार यादवच्या फलंदाजीतील कामगिरीची मला अजिबातच चिंता नाही. संघहिताला प्राधान्य देत आक्रमक शैलीत खेळताना कधीतरी अपयश येणारच, असे म्हणत भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने ट्वेन्टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमारला पाठिंबा दर्शविला..**




सूर्यकुमारने कर्णधार म्हणून यशस्वी कामगिरी केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने अलीकडेच आशिया चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेचे जेतेपद पटकावले. मात्र, या स्पर्धेत फलंदाज म्हणून तो अपयशी ठरला. त्याला सात डावांत केवळ ७२ धावाच करता आल्या. सूर्यकुमारने आंतरराष्ट्रीय स्तरावर वर्षभरापासून अर्धशतक केलेले नाही. परंतु प्रशिक्षक गंभीर याबाबत निश्चिंत आहे. सूर्यकुमारला ३० चेंडू खेळून ४० धावा करणे सहज शक्य आहे. तसे केल्यास त्याच्यावर टीकाही होणार नाही. मात्र, संघ म्हणून आम्ही ठरविलेल्या अतिआक्रमक शैलीत खेळताना कधीतरी अपयश येणार हे आम्हाला ठाऊक आहे. आम्ही ही बाब स्वीकारली आहे. आमचा सूर्यकुमारसह सर्व खेळाडूंना पूर्ण पाठिंबा आहे. संघहित सर्वांत महत्त्वाचे," असे गंभीरने 'जिओहॉटस्टार'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.आशिया चषकात एकीकडे सूर्यकुमारला अपयश येत असताना, दुसरीकडे अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांसारख्या युवकांनी चमकदार कामगिरी केली. "अभिषेक चांगल्या लयीत आहे. संपूर्ण आशिया चषकात त्याने सातत्य राखले हे विशेष. सूर्यकुमारला स्वत:ची जबाबदारी ठाऊक आहे. त्याला सूर गवसल्यावर तोसुद्धा महत्त्वपूर्ण योगदान देईल याची आम्हाला खात्री आहे.ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये वैयक्तिक धावांपेक्षा खेळण्याची शैली जास्त महत्त्वाची असते. आम्ही आक्रमक शैलीतच खेळायचे ठरवले आहे. आमचे फलंदाज काही वेळा अपयशी ठरतील, पण जितके वेळा ते यशस्वी ठरतील, तितके वेळा संघ म्हणून आम्हाला रोखणे प्रतिस्पर्ध्याला अवघड जाईल. आमच्या दृष्टीने केवळ धावा महत्त्वाच्या नाहीत," असे गंभीरने स्पष्ट केले.सूर्यकुमार उत्तम खेळाडू आहेच, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो चांगला माणूस आहे. असा माणूस यशस्वी कर्णधार होतोच. त्याला वेळोवेळी योग्य सल्ला देणे हे माझे काम आहे. हा त्याचा संघ आहे आणि त्याला योग्य वाटतील असे निर्णय घेण्याची त्याला पूर्ण मुभा आहे. सूर्यकुमारने कर्णधार म्हणून यशस्वी कामगिरी केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने अलीकडेच आशिया चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेचे जेतेपद पटकावले.

### सर्व खेळाडूंना पूर्ण पाठिंबा

सूर्यकुमार उत्तम खेळाडू आहेच, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे तो चांगला माणूस आहे. असा माणूस यशस्वी कर्णधार होतोच. त्याला वेळोवेळी योग्य सल्ला देणे हे माझे काम आहे. हा त्याचा संघ आहे आणि त्याला योग्य वाटतील असे निर्णय घेण्याची त्याला पूर्ण मुभा आहे. सूर्यकुमार यादवच्या फलंदाजीतील कामगिरीची मला अजिबातच चिंता नाही. संघहिताला प्राधान्य देत आक्रमक शैलीत खेळताना कधीतरी अपयश येणारच

मात्र, या स्पर्धेत फलंदाज म्हणून तो अपयशी ठरला. त्याला सात डावांत केवळ ७२ धावाच करता आल्या. सूर्यकुमारने आंतरराष्ट्रीय स्तरावर वर्षभरापासून अर्धशतक केलेले नाही. परंतु प्रशिक्षक गंभीर याबाबत निश्चिंत आहे. सूर्यकुमारला ३० चेंडू खेळून ४० धावा करणे सहज शक्य आहे. तसे केल्यास त्याच्यावर टीकाही होणार नाही. मात्र, संघ म्हणून आम्ही ठरविलेल्या अतिआक्रमक शैलीत खेळताना कधीतरी अपयश येणार हे आम्हाला ठाऊक आहे. आम्ही ही बाब स्वीकारली आहे. आमचा सूर्यकुमारसह सर्व खेळाडूंना पूर्ण पाठिंबा आहे. संघहित सर्वांत महत्त्वाचे," असे गंभीरने 'जिओहॉटस्टार'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.आशिया चषकात एकीकडे सूर्यकुमारला अपयश येत असताना, दुसरीकडे अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांसारख्या युवकांनी चमकदार कामगिरी केली. "अभिषेक चांगल्या लयीत आहे. संपूर्ण आशिया चषकात त्याने सातत्य राखले हे विशेष. सूर्यकुमारला स्वत:ची जबाबदारी ठाऊक आहे. त्याला सूर गवसल्यावर तोसुद्धा महत्त्वपूर्ण योगदान देईल याची आम्हाला खात्री आहे.ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये वैयक्तिक धावांपेक्षा खेळण्याची शैली जास्त महत्त्वाची असते. आम्ही आक्रमक शैलीतच खेळायचे ठरवले आहे. आमचे फलंदाज काही वेळा अपयशी ठरतील, पण जितके वेळा ते यशस्वी ठरतील, तितके वेळा संघ म्हणून आम्हाला रोखणे प्रतिस्पर्ध्याला अवघड जाईल. आमच्या दृष्टीने केवळ धावा महत्त्वाच्या नाहीत.

# बव्हुमाचे कसोटी मालिकेसाठी पुनरागमन

## भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कर्णधार टेम्बा बव्हुमा पायाच्या दुखापतीतून सावरला असून भारताविरुद्धच्या आगामी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी त्याचा दक्षिण आफ्रिकेच्या संघात समावेश करण्यात आला आहे. या मालिकेचे सामने अनुक्रमे कोलकाता (१४ ते १८ नोव्हेंबर) आणि गुवाहाटी (२२ ते २६ नोव्हेंबर) येथे होणार आहे.**



जायबंदी असल्याने बव्हुमा पाकिस्तानविरुद्ध नुकतीच झालेली दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळू शकला नव्हता. ही मालिका १-१ अशी बरोबरीत सोडविणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या संघातील जवळपास सर्वच खेळाडूंचे स्थान कायम राहिले आहे. बव्हुमाने दीड महिन्यापासून स्पर्धात्मक सामना खेळलेला नाही. त्यामुळे फलंदाजीचा सराव करता यावा यासाठी बव्हुमा २ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या भारत 'अ' संघाविरुद्धच्या अनौपचारिक कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिका 'अ' संघाचे प्रतिनिधित्व करेल. या मालिकेतून भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतही दुखापतीतून पुनरागमन करणार

### पंतचेही दुखापतीतून पुनरागमन

संघाविरुद्धच्या अनौपचारिक कसोटी मालिकेत दक्षिण आफ्रिका 'अ' संघाचे प्रतिनिधित्व करेल. या मालिकेतून भारताचा यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतही दुखापतीतून पुनरागमन करणार आहे.कसोटी मालिकेसाठी सायमन हार्मर, केशव महाराज आणि सेनुरन मुथुस्वामीच्या रूपात तीन फिरकीपटूंना दक्षिण आफ्रिकेच्या संघात स्थान मिळाले आहे.

आहे.कसोटी मालिकेसाठी सायमन हार्मर, केशव महाराज आणि सेनुरन मुथुस्वामीच्या रूपात तीन फिरकीपटूंना दक्षिण आफ्रिकेच्या संघात स्थान मिळाले आहे. या तिघांनी पाकिस्तानच्या फिरकीला अनुकूल खेळपट्ट्यांवर प्रभावी कामगिरी केली होती. भारतातही त्यांना खेळपट्टीकडून मदत मिळणे अपेक्षित आहे. कगिसो रबाडा, अष्टपैलू कॉर्बिन बॉश, मार्को यान्सन आणि वियान मुल्डर वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतीलही मालिका १-१ अशी बरोबरीत सोडविणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या संघातील जवळपास सर्वच खेळाडूंचे स्थान कायम राहिले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। मंगळवार।
। दि. 28 ऑक्टोबर 2025।

## भगिनींचे रक्षण करण्यासाठी

# छट मातेने मला शक्ती द्यावी- महेश लांडगे

### श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथे छट पूजेचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड :"छट माता तुमच्या सर्वांच्या मनोकामना पूर्ण करो, अशी मी प्रार्थना करतो आणि सर्व भगिनींचे रक्षण करण्यासाठी छट मातेने मला शक्ती द्यावी," असे आमदार महेश लांडगे म्हणाले.**



श्री विश्व श्रीराम सेनेच्या वतीने मोशी येथे छट पूजेचे आयोजन संस्थापक डॉ. लालबाबू अंबिकालाल गुप्ता यांच्या वतीने मोशी येथे इंद्रायणी नदीच्या घाटावर सोमवारी छटपूजा श्री सूर्यषष्ठी महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पारंपरिक पद्धतीने महंत श्री राजुदास महाराज यांच्या हस्ते इंद्रायणी मातेचे पूजन करण्यात आले. यानंतर गंगा आरती करण्यात आली.

यावेळी आमदार महेश लांडगे, विश्व हिंदू परिषदेचे सहमंत्री शंकर गायकर, माजी महापौर राहुल जाधव, आयोजक डॉ. लालबाबू अंबिकालाल गुप्ता, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग साने, सुधीर काळजे, निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, विकास पाटील, प्रमोद गुप्ता, श्याम गुप्ता, दीपक चव्हाण, विजय पाटील, संदीप साकोरे व छटपूजा निमित्त आलेले भक्त भाविक उपस्थित होते.

यावेळी आमदार महेश लांडगे म्हणाले की, छट माता तुमच्या सर्वांच्या मनोकामना पूर्ण करो, अशी मी प्रार्थना करतो आणि सर्व हिंदू भगिनींचे रक्षण करण्यासाठी छट मातेने मला शक्ती द्यावी असे आशीर्वाद मागतो.

विश्व हिंदू परिषदेचे सहमंत्री शंकर गायकर म्हणाले की, या सूर्यषष्ठी महोत्सवात छट मातेचे व्रत केले जाते. निसर्गात आणि समाजात एकरूपता यावी. सर्वांचे कल्याण व्हावे, पिक पाणी मुबलक यावे, यासाठी सूर्याला अर्ध्य देऊन त्याची उपासना केली जाते. सनातन धर्मात नदीला मातेचा दर्जा आहे. या महोत्सवात मातेचे पूजन करून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश जगभर दिला जातो.

---

## अन् त्यांची दिवाळी गोड झाली!

### माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांच्या हस्ते सफाई कामगार, आशा सेविका सन्मानित

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवे लावून घर उजळते. पण माणसांच्या हास्याने समाज उजळतो. दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि एकत्रतेचा उत्सव आहे. म्हणूनच या उत्सवामध्ये आपले रोजचे जीवन स्वच्छ आनंददायी आणि सुकर करणाऱ्या हातांचा सन्मान कोणी गरजेचे आहे असे मत माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांच्या हस्ते करण्यात आला.**



दिवाळी सणाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १२ मधील सफाई कामगार, घंटागाडी कामगार, ड्रेनेज सफाई कर्मचारी, आशा सेविका, अंध नागरिक, तसेच बचत गटाच्या समन्वयक व सहाय्यक महिलांचा माजी नगरसेवक शांताराम भालेकर यांच्या वतीने दिवाळी भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

भालेकर यावेळी म्हणाले या उपक्रमाद्वारे समाजातील प्रत्येक घटकाला आनंदाचा स्पर्श मिळावा आणि त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी, हा उद्देश होता. या निमित्ताने कामगारांच्या चेहऱ्यावर उमटलेले हसू पाहून आयोजकांना मनस्वी समाधान लाभले. या सर्व मेहनती हातांमुळेच शहर उजळते, परिसर स्वच्छ राहतो आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण होते. या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला भेटवस्तू देऊन त्यांच्या आनंदात सहभागी होण्याची संधी आम्हाला मिळाली.

कार्यक्रमास रुपीनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंत पतंगे, अध्यक्ष प्रभाकर चौधरी, लक्ष्मण गुरसाळी, रमेश पाटोळे, कॅप्टन कदम, अरुण वाळुंजकर, त्र्यंबक गायकवाड, सुदामराव शिंदे, बाबुराव लहाने, कोंडीबा भालेकर, रमेश भालेकर, पांडुरंग भालेकर, शिरीष उतेकर, दीपक बोर्डे, गजानन वाघमोडे, रवी एकशिंगे, हनुमंत कलमोरगे, रामभाऊ भालेकर, ज्ञानेश्वर माऊली भालेकर, पंढरीनाथ भालेकर, अनिल भालेकर, अमोल भालेकर, दिगंबर भालेकर, राजाराम भालेकर, सुनील भालेकर, सुनील आमने, बाळासाहेब तुपे, मधुकर भालेकर, संभाशेठ भालेकर, रविराज शेतसंधी, अरविंद साळुंखे, महेश भालेकर, मंगेश नखाते, शरद गोपाळ भालेकर, अजित संभाजी भालेकर, संतोष पवार, बबन चव्हाण, सागर चव्हाण, रामदास कुटे, सोमनाथ मेमाणे, रामदास गवारे, रोहिदास भालेकर, सागर भालेकर, विजय थिटे, बबन भालेकर, शिवाजी बिटके, भानाशेठ भालेकर, के के भालेकर, शरद नारखेडे, सनी पवार, दत्तात्रय घोडके, अस्मितताई भालेकर, शितलताई वर्णेकर, वैशाली भालेकर, मंगल भालेकर, संगीताताई भालेकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विलास आबुज, दत्ता चव्हाण, स्वप्निल वाघमारे, नारायण माळी, सचिन गायकवाड, दिग्विजय सवाई, कमलेश भालेकर, तुषार भालेकर, निलेश भालेकर, अभिषेक भालेकर, हर्षल भालेकर, सचिन भालेकर, संतोष निकाळजे, प्रदीप जैसवाल आणि सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभम खेडकर यांनी केले.


## पिंपळे निलख परिसरातील

# हॉटेलमध्ये अवैध व्यवसायाचा संशय!

## तुषार कामठे यांचे पोलिस प्रशासनाला पत्र; नागरिकांची तातडी कारवाईची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड (प्रतिनिधी) : पिंपळे निलख परिसरातील विशाल नगर आणि जगताप डेअरी परिसरात असलेल्या काही हॉटेलमध्ये अवैध व्यवसाय सुरू असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला असून, स्थानिक नागरिकांमध्ये त्यामुळे तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. या प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी पोलिस प्रशासनाला लेखी निवेदन सादर करत तातडी चौकशी आणि कारवाईची मागणी केली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार
पिंपरी-चिंचवड, शहर जिल्हा
श्री. तुषार गजानन कामठे
शहराध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड शहर जिल्हा.

प्रति,
मा. पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय
पिंपरी चिंचवड

दिनांक : 27/10/2025

विषय: पिंपळे निलख, विशाल नगर, जगताप डेअरी परिसरातील साई इन व ओयो हॉटेलमध्ये सुरू असलेल्या अवैध व्यवसायाविषयी तात्काळ कारवाई करण्याबाबत.

महोदय,

सदर कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड येथील पिंपळे निलख, विशाल नगर, जगताप डेअरी परिसरात असलेल्या साई इन व ओयो या हॉटेलमध्ये काही दिवसांपासून अवैध व गैरप्रकारचे व्यवसाय सुरू असल्याची स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या ठिकाणी सतत संशयास्पद हालचाली होत असून परिसरातील नागरिक, महिला व विद्यार्थिनींमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

तरी आपण त्वरित याची सखोल चौकशी करून अवैध व्यवसाय बंद करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, ही विनंती.

जर वरील ठिकाणी अवैध व्यवसाय तत्काळ बंद करण्यात आला नाही, तर स्थानिक नागरिकांना जनआंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, याची नोंद घ्यावी.

आपली ता[illegible] ...ई अपेक्षित आहे.

आपल[illegible]
तुषार [illegible]
शहराध्[illegible] (शरदचंद्र पवार गट)
पिंपर[illegible]
मो. नं. [illegible]
दिनांक: [illegible]

कामठे यांनी त्यांच्या पत्रात म्हटले आहे की, साई इन आणि ओयो या दोन हॉटेलांमध्ये रात्री उशिरापर्यंत संशयास्पद हालचाली दिसून येत आहेत. या हॉटेलांमध्ये अनेकदा बाहेरील व्यक्तींची वारंवार ये-जा सुरू असते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी हॉटेल व्यवसायाच्या आड अवैध व्यवसायाचे संचालन सुरू असल्याचा त्यांना ठाम संशय आहे. त्यामुळे या भागातील शांतता आणि सामाजिक वातावरण धोक्यात येऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले आहे.

"या भागात काही दिवसांपासून बाहेरील व्यक्ती मोठ्या प्रमाणात येताना दिसत आहेत. काही वेळा रात्री उशिरा चारचाकी आणि दुचाकी वाहने थांबत असल्याचे दिसून येते. परिसरातील रहिवाशांनी या हालचालींबाबत अनेक वेळा शंका व्यक्त केली आहे. हॉटेलच्या नावाखाली चालणाऱ्या या संशयास्पद हालचालींमुळे महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे," असे तुषार कामठे यांनी पत्रात म्हटले आहे.

कामठे यांनी पुढे सांगितले की, संबंधित हॉटेलचे व्यवस्थापनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे परिस्थिती आणखी संशयास्पद वाटते. "सदर हॉटेलमध्ये कोणते व्यवसाय चालतात, तिथे राहणाऱ्या व्यक्तींची नोंद आहे का, त्यांचे ओळखपत्र तपासले जातात का, याची खात्री करणे गरजेचे आहे," असेही त्यांनी पोलिसांना उद्देशून म्हटले आहे.

या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी देखील पोलिस ठाण्याशी संपर्क साधून तक्रार दिली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या भागात पूर्वी शांतता होती, मात्र अलीकडे रात्रीच्या वेळी अनोळखी व्यक्तींची हालचाल वाढली आहे. काहीजण मद्यप्राशन करून गोंधळ घालत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. "आमच्या सोसायट्यांमधील कुटुंबांना सुरक्षित वातावरण हवे आहे. लहान मुले आणि महिलांची सुरक्षा धोक्यात येऊ नये, म्हणून पोलिसांनी कडक पावले उचलावीत," अशी मागणी स्थानिकांनी केली.

या पार्श्वभूमीवर तुषार कामठे यांनी पोलिस प्रशासनाला आवाहन केले आहे की, "स्थानिक रहिवाशांच्या तक्रारी गांभीर्याने घेऊन संबंधित हॉटेलमध्ये तातडीने चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी. नागरिकांचा विश्वास आणि परिसरातील सुरक्षितता राखणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे."

संपर्क साधल्यावर पोलिस सूत्रांनी सांगितले की, संबंधित तक्रारीची नोंद घेण्यात आली असून प्राथमिक तपास सुरू आहे. "जर अवैध कृत्यांचा पुरावा मिळाला, तर कठोर कारवाई केली जाईल," असे पोलिसांनी सांगितले.

पिंपळे निलख हा गेल्या काही वर्षांत वेगाने विकसित झालेला आणि मध्यमवर्गीय कुटुंबांचे प्रमाण वाढलेला परिसर आहे. त्यामुळे या भागात शांती आणि सामाजिक सुव्यवस्था टिकवण्यासाठी अशा प्रकारच्या संशयास्पद हॉटेलांवर कारवाईची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

---

## इंद्रायणीनगरमध्ये किल्ले बनवा स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद

### 310 जणांचा सहभाग; 62 किल्ल्याच्या प्रत्यक्ष दुर्ग प्रतिकृती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: श्री साई चौक मित्र मंडळ आणि विलासभाऊ मडिगेरी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणीनगर, भोसरी येथील श्री वैष्णोमाता मंदिर प्रांगणात दिपावलीनिमित्त किल्ले बनवा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत 310 इतक्या लहानग्यांनी सहभागी होत एकूण 62 वेग वेगळे किल्ल्याच्या प्रत्यक्ष दुर्ग प्रतिकृती बनवल्या. तर, विजेत्या स्पर्धकांचा बक्षिस वितरण समारंभ ही नुकताच पार पडला. तसेच पुढील 7 प्रदर्शन ठेवला होता.**



दुर्ग बनवा स्पर्धा १७ ते १९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पार पडली. स्पर्धेचे यंदाचे हे पाचवे वर्षे आहे. स्पर्धेत ५ ते १४ या वयोगटातील मुले सहभागी झाले होते. किल्ला बनविण्यासाठी माती, विट, दगड,पाणी, बारदान, पांढरी व हिरवी रांगोळी, कोळसा पूड आदी सर्व साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. स्पर्धेतील पहिल्या पाच किल्ल्याच्या विजेत्या मुलांना रोख रक्कम बक्षीस प्रथम किल्ला राजगड ११,१११, द्वितीय किल्ला प्रतापगड ९,९९९, तृतीय किल्ला शिरगाव ७,७७७, चतुर्थ किल्ला लींगणा ५,५५५, पंचम किल्ला अंकाई ३,३३३तसेच आणखी किल्ल्याच्या विजेत्या परीक्षकांच्या सूचनेनुसार उत्तेजनार्थ म्हणून प्रबळगड , राजमाची गड , केळवे गड, जंजिरा असे पाच किल्याना रोख बक्षीस तसेच प्रत्येकाला ट्रॉफी व टिफीन बॉक्स देऊन गौरविण्यात आले. तर, सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ रविवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, आरएसएसचे प्रांत मंडळ सदस्य विलास लांडगे, टाटा मोटर्स युनियनचे माजी अध्यक्ष तथा कामगार नेते सचिन लांडगे, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी, चंद्रकांत देशमुख, नेताजी घारे उपस्थितीत पार पडला.

विलास मडिगेरी म्हणाले की, लहानपणीच आपल्या मुलांवर इतिहासाचा संस्कार झाला पाहिजे. या उद्देशाने आम्ही या ठिकाणी मागील चार वर्षांपासून ही स्पर्धा घेत असून यावर्षी हे पाचवे वर्ष आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील त्याच उत्साहाने असंख्य मावळे यात सहभागी झाले असून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. तसेच या सहभागी सर्व मुलांना शिवनेरी किल्ल्या भेटीस घेवून जाणार आहे.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS
THROUGH LEARNING
Admission
Open
FOR 2026 – 27
Nursery – Std X
• CBSE Curriculum
• Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
• Digital Classrooms with AV Facilities
• Skill Development Programs including:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
• Focus on Holistic Development
Enroll Now!
Sunday Open: From 10 AM to 1 PM
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune